**पद्यपाठ ५**
**घनश्याम सुंदरा श्रीधरा- होनाजी बाळा**
**ठळक मुद्दे-**

- **कवितेचे नाव घनश्याम सुंदरा श्रीधरा**
- **होनाजी बाळा** (१८वे शतक अखेर व १९वे शतक पूर्वार्ध)
- **काव्यप्रकार –** भूपाळी
- **विषय –** यशोदेने अरुणोदय होता कृष्णाला जागे होण्यासाठी केलेले प्रयत्न.
- **भाषिक वैशिष्ट्ये:** गेय, तालबद्ध व साधी सरल रचना,अनुप्रास अलंकाराचा वापर,संस्कृत शब्दांचा वापर.
- **स्वाध्याय**
- **पूरक वाचन**

**भूपाळी विषयी**:

भूपाळी हा परमेश्वराला जागे करण्यासाठी पहाटेच्यावेळी गायला जाणारा गीतप्रकार आहे. परमेश्वराचे बालरूप कल्पून, त्याला उठविताना त्याच्या लोभस रूपाचे माता कौतुकाने वर्णन करते, साखरझोप सोडून त्याने जागे व्हावे व रोजच्या कामांना सुरुवात करावी यासाठी त्यात विनवणी केली जाते. त्यामुळे त्यातील भाव आपल्या ओळखीचा आणि जवळचा वाटतो. तुमच्या पाठ्यपुस्तकात जी भूपाळी आहे ती वाचल्यावर तुम्हाला असे जाणवले का?

भूपाळी विषयी अधिक सांगायचे म्हणजे त्या सहसा भूप रागात बांधलेल्या असतात. भूप रागातली काहे गाणी तुम्हाला येथे क्लिक केल्यावर ऐकता येतील.

http://www.aathavanitli-gani.com/Song/Dehachi_Tijori

https://www.youtube.com/watch?v=6_nc-etimxI

होनाजीबाळाने लावण्या आणि फटके, गौळणी अशी वेगवेगळी काव्ये रचली. आता, भूप रागात चाल लावलेली भूपाळी झलक ऐका. तुमच्या पाठ्यपुस्तकातल्या भूपाळीला तशी चाल लावून तुम्हालाही म्हणता येते का ते पहा.-*(येथे क्लिक केल्यास **घनश्याम सुंदरा श्रीधरा** ही भूपाळी text मध्ये दिसावी व सोबत गाणेही ऐकता यावे.)http://www.aathavanitli-gani.com/Song/Ghan_Shyam_Sundara*

**कवितेचा शब्दार्थ:**

घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला
उठिं लवकरि वनमाळी उदयाचळी मित्र आला ||ध्रु||

सायंकाळीं एके मेळीं द्विजगण अवघे वृक्षीं
अरुणोदय होताच उडाले चरावया पक्षी ||१||
अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरणदक्षी
प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी ||२||
करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षीं
यमुनाजळासि जाति मुकुंदा दध्योदन भक्षी ||३||

मुक्तता होऊं पाहे । कमळिणीपासुनियां भ्रमरा
पूर्वदिशे मुख धुतलें । होतसे नाश तिमिरा
उठिं लवकरि गोविंदा । सांवळ्या नंदकुमारा ||४||

मुखप्रक्षालन करीं अंगिकारी भाकर काला-
उठिं लवकरि वनमाळी उदयाचळी मित्र आला ||५||

हे घनश्याम (सावळया ढगासारखा) सुंदर श्रीकृष्णा! अरुणोदय (सूर्याचा उदय)झाला आहे, तेव्हा हे वनमाळी-(कृष्णाचे अजून एक नाव) लवकर ऊठ || धृ ||

(१) सायंकाळी झाडावर बसलेले (जमलेले) सगळे पक्षी (एकेमेळीं= एकत्र येऊन) अरुणोदय होताच, चारा शोधायला उडून गेले.

(२) तापस लोक म्हणजे तपाचरण करणारे ,स्नान करून, स्वच्छ होऊन तप करण्याच्या कामात दक्ष म्हणजे मग्न झाले.प्रभातकाळी-सकाळी उठून यात्रेकरू प्रवासी आपल्या पुढील तीर्थक्षेत्राच्या वाटेवर लक्ष देऊन मार्गस्थ झाले.

(३) गोपी घरापुढील अंगणात झाडलोट करून म्हणजे संमार्जन करून सडा वगैरे टाकून, कमरेवर घागर घेऊन यमुनेला पाणी भरायला चालल्या आहेत. तेव्हा हे मुकुंदा ( कृष्णाचे अजून एक नाव) तू दहीभात खा.

(४) भुंगा कमळातून बाहेर पडू पहात आहे, पूर्व दिशेने आपले मुख धुतलेले आहे (म्हणजे पूर्वेला पूर्ण उजाडल्यामुळे ती स्वच्छ दिसत आहे), त्यामुळे तिमिर म्हणजे अंधाराचाही लोप –नाश झलेला आहे, तेव्हा सावळया नंदकुमारा (नंद राजाचा मुलगा) गोविंदा (कृष्णाचे नाव) लवकर ऊठ.

(५) ड धू (मुखप्रक्षालन कर) आणि हा भाकरीकाला घे , तिचा स्वीकार कर. हे वनमाळी लवकर ऊठ , उद्याचलावर- पूर्वेला, मित्र-सूर्य उगवला आहे.

**भूपाळीचा भावार्थ-**

१. विद्यार्थी मित्रमैत्रिणींनो, तुम्ही आत्ताच कवितेचा अर्थ बघितलात. आता, त्या कवितेचा सुचाकार्थ काय आहे ते पाहू या. कृष्णाने गाढ झोपेतून उठून, पहाटेचे रम्य वातावरण पाहावे अशी यशोदेची इच्छा आहे. आणि त्यासाठी ती सूर्योदयाच्या विविध छटा, कृष्णाला दाखवू पाहात आहे. कृष्णाने डोळेतरी उघडावेत (म्हणजे जागे व्हावे) आणि आजूबाजूचे दृश्य पाहावे म्हणून विनावणारी ही आई आहे. नुसते ऊठ म्हटले किंवा सकाळ झाली आहे असे म्हटले तर तो काही उठणार नाही. परंतु सूर्य म्हणजे 'मित्र' भेटायला आला आहे असे सांगून तो उठेल असे तिला वाटते. आता, अजून एक गंमत भाषेच्या दृष्टीने, कवीने कशी केली आहे ते पहा बर का- **मित्र** हे सूर्याचे संस्कृतातील नाव परंतु मराठीत त्याचा सखा असाही अर्थ होत असल्याने कवितेत दोन अर्थ निर्माण होतात. आणि त्यामुळे कवितेचे सौंदर्य वाढते.

कृष्णाला हाक मारताना यशोदा, कृष्णाच्या रूपाचे वर्णन लाडाने व कौतुकाने '**घनश्याम**', '**सुंदर**', ' **श्रीधर**','**सावळया**', '**नंदकुमार**', '**वनमाळी**'असे करते. अशा अनेक नावांनी हाक मारून आपले वात्सल्यही ती दर्शवते.

वरील युक्तीनेही श्रीकृष्णाला जाग येत नाही (किंवा तो उठत नाही) म्हटल्यावर ती पक्षी, यात्रेकरू, गोपी व तपश्चर्या करणाऱ्यांची उदाहरणे देते. थोडक्यात पक्ष्यांपासून माणसांपर्यंत सर्वजण आपापल्या कामाला लागतात तेव्हा तूही उठून कामाला लाग असं ती सांगायचा प्रयत्न करते आहे..

यशोदा कृष्णाचे लक्ष भोवतालच्या सृष्टीकडेही वळवते. त्यातही कशी जाग आले आहे हे सांगण्यासाठी भुंग्याचे कमलातून बाहेर पडून मुक्त होणे व पूर्वदिशेने आपल्या मुखावरील अंधाराची काजळी धुवून टाकली आहे आणि त्यामुळे प्रकाश झाला आहे अशा कल्पना कवितेते आलेल्या दिसतात. अगदी थोड्या ओळींमधेच कवी माणसांसह संपूर्ण सजीवसृष्टीला कवितेत समाविष्ट करतो. अशातून, कवीचे भाषेवरील प्रभुत्त्व तुम्हालाही लक्षात आले असेल. आता, ह्या कवितेतलं भाषिक सौंदर्य समजून घेण्यासाठी पुढील स्लाईड पहा व ऐका.

**भूपाळीचे भाषिक सौंदर्य-**

तुम्हाला हे जाणवले असेल की भूपाळीत अनेक संस्कृत शब्द आलेले आहेत. कोणकोणते आहेत ओळखता येतील का? पहा: 'उदयाचळी', ' अरुणोदय', 'मित्र' 'द्विजगण', 'अघमर्षणादि'. ह्या शब्दांमुळे काय साध्य झाले? तर' पूर्वदिशेला आकाशात लाली पसरली आहे हे मोठे वाक्य 'अरुणोदय' ह्या एका शब्दात सामावून गेले. अंघोळ करून, स्वच्छ होऊन ह्या वाक्याचा अर्थ 'अघमर्षणादि' ह्या एका शब्दात आला. शिवाय कवितेत अनेक अर्थ निर्माण करण्याचे जे सामर्थ्य असते तेही साध्य झाले. उदा. 'मित्र' हा शब्द सूर्याचे आणखी एक नाव आणि मित्रासारखे येणे असे दोन्ही अर्थ सूचित करतात.

'अरुणोदय झाला', 'उदयाचळी' 'प्रभातकाळी' असे पहाटेचे वर्णन करणारे शब्द वापरून,अतिशय प्रसन्न वातावरण कवी तयार करतो. कविता वाचताना एक प्रकारचे शब्दचित्रच आपल्या डोळयासमोर उभे राहते. आईच्या विनवणीच्या सुरात कुठेही राग किंवा उठवण्याची घाई दिसत नाही. त्यामुळे एक शांत हळूवारपणा ह्या संपूर्ण भूपाळीत जाणवत राहतो. ही भूपाळी ऐकताना तिच्या ठेक्यात व चालीतही तुम्हाला ही शांतता जाणवली का?

रोजच्या अनुभवातील कितीतरी उदाहरणे वापरून कवितेतील सौंदर्य कवीने वाढवले आहे. ही भूपाळी जवळजवळ २०० वर्षांपूर्वीची आहे. त्यावेळच्या ग्रामजीवनाचे दृश्य या भूपाळीत दिसते. जसे रोज सहज दिसणारा रम्य अरुणोदय, किंवा गोपींचे पाणी भरायला जाणे अथवा पक्ष्यांचे चारा शोधायला जाणे. आजच्या शहरी जीवनात किंवा जिथे सहज डोंगर, झाडे पक्षी दिसत नाहीत अशा ठिकाणी राहणाऱ्यांसाठी हे दृश्य नवलाई आणते .

पहिल्या कडव्यात पूर्वेला नुकतीच लाली आली आहे असा उल्लेख येतो (अरुणोदय) तर शेवटच्या कडव्यात पूर्ण उजाडले आहे व म्हणून पूर्व दिशा तोंड स्वच्छ धुतल्यासारखी दिसते आहे असा उल्लेख कवी करतो. ह्या दोन घटीकांमध्ये खरेतर फार अंतर नसते. ह्याचा अनुभव आपणही कधी न कधी घेतला असेल. *दिवस पुढे पुढे चालला आहे व उशीर होत आहे* असे थेट न सांगता कवीने आपल्या शब्दसामर्थ्यातून त्याची सूचना, अरुणोदय, प्रभात अशा शब्दांतून दिली आहे.

**कवितेतील अलंकार**

भुंग्याचे कमळातून मुक्त होणे व पूर्वदिशेने आपल्या चेहऱ्यावरील अंधार पुसून लख्ख होणे ह्या दोन्ही घटना अरुणोदयाच्या संकेत देणाऱ्या आहेत. त्यामुळे कवितेत त्या दृष्टांतातील दाख्ल्यान्सारखे वापरले आहेत.

कवितेत यमक आणि अनुप्रास असे दोन्ही शब्दालंकार आलेले आहेत. तुमच्या पाठ्यपुस्तकात असलेल्या अलंकार ह्या प्रकारणाआधारे कवितेतील आणखी काही अलंकार शोधून पहा.

**<u>उजळणी प्रश्न</u>**

**<u>पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.</u>**

१. भूपाळीत श्रीकृष्णाला कोणकोणत्या नावांनी संबोधले आहे?
२. अरुणोदय झाल्यावर कोणकोण कामास लागले आहेत?
३. पुर्वदिशेने मुख धुतल्यामुळे काय झाले आहे?
४. कृष्णाला काय खायला याशोदामाता उठवत आहे?

पुढील प्रश्नांच्या आधारे धड्याचा विचार करा व ३० ते ४० शब्दांत उतरे द्या.

१. कृष्णाने उठवण्यासाठी याशोदामाता कशाकशाचे वर्णन करत आहे?
२. कमळापासून भ्रमराची सुटका कधी होते? ही उपमा का वापरली आहे?

संदर्भासहित स्पष्टीकरण द्या:

१) उठिं लौकरि वनमाळी उद्याचळीं मित्र आला
२) यमुनाजळासि जाति मुकुंदा दध्योदन भक्षी.

**<u>मुक्त प्रश्न</u>**

भाषेविषयी:

१) कवितेतील शब्दालंकार शोधा व उदाहरणे द्या. (पुस्तकातील अलंकार ह्या टिपणाचा आधार घ्या.)

२) पुढील शब्दांची फोड करा.

| | |
|---|---|
| घनश्याम | |
| अरुणोदय | |
| द्विजगण | |
| तपाचरण | |
| सडासंमार्जन | |
| नंदकुमार | |
| भाकरकाला | |

३) निबंध: अरुणोदय,प्रभातकाळ,सकाळ ह्या शब्दांतील अर्थच्छटा लक्षात घ्या व तुम्ही पाहिलेल्या अविस्मरणीय अरुणोदयावर वर्णनपर निबंध लिहा.

४) 'फिटे अंधाराचे जाळे' ही आधुनिक काळातील पहाटेविषयीची कविता वाचा. ह्या वर्णनात काय वेगळेपण आहे ते शोधा व लिहा.

**फिटे अंधाराचे जाळे झाले मोकळे आकाश**

**दरीखोऱ्यांतून वाहे एक प्रकाश प्रकाश**

**रान जागे झाले सारे पायवाटा जाग्या झाल्या**

**सूर्य जन्मता डोंगरी संगे जागल्या सावल्या**

**एक अनोखे लावण्य आले भरास भरास**

**दंव पिऊन नवेली झाली गवताची पाती**

**गाणी जुनीच नव्याने आली पाखरांच्या ओठी**

**क्षणापूर्वीचे पालटे जग उदास उदास**

**झाला आजचा प्रकाश जुना कालचा काळोख**

**चांदण्याला किरणांचा सोनसळी अभिषेक**

**सारे रोजचे तरीही नवा सुवास सुवास**

**साऱ्या रंगावर आली एक सोनेरीशी झाक**

**भिडे काळजाला थेट निळ्या क्षितिजाची हाक**

**तुझ्या नसण्याची कळ गेली तळास तळास**

**गीत - सुधीर मोघे**

हे गाणे तुम्ही पुढील संकेतस्थळावर ऐकूही शकता!-

http://www.aathavanitli-gani.com/Song/Phite_Andharache_Jale

५) 'प्रभाती सूर नभी रंगती' हे गीत वाचा. ह्या गीतात कशाकशाचे वर्णन आले आहे? घनश्याम सुंदरा आणि ह्या कवितेत तुम्हाला सापडलेली समान वर्णने लिहा.

**प्रभाती सूर नभी रंगती,**

**दशदिशा भूपाळी म्हणती**

**पानोपानी अमृत शिंपित**

**उषा हासरी हसते धुंदित**

**जागी होऊन फुले सुगंधित तालावर डोलती**

**कृषीवलांची हाक ऐकुनी**

**मोट धावते शेतांमधुनी**

**पक्षी अपुल्या मधुर स्वरांनी, स्वरांत स्वर मिळविती**

**प्रसन्न वदनी सुहासिनी कुणि**

**सडे शिंपिती मृदुल करांनी**

**श्रीविष्णूचे नाम स्मरूनी तार कुणी छेडिती**

**गीत - रमेश अणावकर**

हे गाणे तुम्ही पुढील संकेतस्थळावर ऐकूही शकता!-
http://www.aathavanitli-gani.com/Song/Prabhati_Sur_Nabhi_Rangati

होनाजी बाळा यांच्याविषयी अधिक माहिती येथे वाचायला मिळेल.